TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- pro@mbmc.gov.in
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ ५१ /२०२२-२३ दि.:- ८ / ४ /२०२२

प्रति,

मा.संपादक/जाहिरात व्यवस्थापक
दैनिक/साप्ता. परशुराम समाचार
------------------------------------
------------------------------------

विषय :- वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांनुसार आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची जाहिरात दि. १० / ४ /२०२२ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

जाहिरात प्रसिध्दीकरिता सुचना :-

१) सदर जाहिरात हि शासकिय दराप्रमाणे प्रसिध्द करणे, आपणांस बंधनकारक राहील.
२) सदर जाहिरातीत १० फॉन्टपर्यंतच्या साईजच्या व कमीत-कमी जागेचा वापर करुन जाहिरात प्रसिध्द करावी.
३) सदर जाहिरात प्रसिध्द करतेवेळी महानगरपालिकेचा लोगो प्रसिध्द करणे आवश्यक राहील.
४) सदर जाहिरातीत www.mbmc.gov.in या महानगरपालिकेच्या वेबसाईटचा उल्लेख करावा.
५) जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जनसंपर्क विभागातील जावक क्रमांकाचा उल्लेख करावा.
६) जाहिरातीत छपाई चुक झाल्यास, आपणांस विनामुल्य पुढील अंकांत जाहिरात प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.
७) जाहिरात प्रसिध्द केलेबाबत वृत्तपत्राच्या चार प्रती दुस-या दिवशी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.
८) जाहिरात प्रसिध्द केलेले वर्तमान पत्राचे बिल १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावे.
९) पाठविलेल्या आर.ओ. मध्ये कुठलाही फेरफार करु नये.
१०) पाठविलेला आर.ओ. आपल्याच वृत्तपत्राच्या नावानिशी पाठविला आहे, याची पुर्ण खात्री करावी व त्यानंतरच वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी.
११) काही शंका असल्यास जनसंपर्क विभागाशी संपर्क करावा.

वरील सुचनांचे अधीन राहून, काटेकोरपणे पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

(राजकुमार घरत)
प्र.जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- जाहिरात

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र.मनपा/वृ.प्रा / ५५ /2022-23 दिनांक :-09/05/2022

## // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या (नग) |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.), प्लॉट नं. 285, हिस्सा नं. 45/2, उत्तन भाटे बदंर, उत्तन लाईट हॉउस रोड, येथिल घराच्या आवारात 02 नग नारळ अंदाजे 35 ते 40 फुट उंच वाढलेले असुन सदरची झाडे जोराच्या वाऱ्याने पडुन घराच्या बाजुला असलेल्या रस्त्यावरिल ये-जा करणा-या रहिवाश्यांच्या जिवास धोका होण्याची शक्यता असुन घराचे नुकसान होऊ शकते.या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. **(श्रीम.लिलि सेबॉस्टीन यांचे दि.25/03/2022 रोजीचे पत्र)** | 02 नग नारळ |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र. मनपा/जनसंपर्क/ ५४ /२०२२-२३
दि. ०९/०५/२०२२.

Gunijan

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र./मनपा/वृ.प्रा./ ५५ /2022-23 दिनांक :- 09/05/2022

जनसंपर्क विभाग
आवक क्र. ५१
दिनांक ९/५/२०२२

प्रति,

**जनसंपर्क अधिकारी,**
**जनसंपर्क विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहिर नोटीस सुचना स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी करण्यात यावी.

सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन त्याची प्रत उदयान व वृक्ष प्राधिकरण विभागास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

Gunijan

**(योगेश गुणिजन)**
**सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**